# अर्थशास्त्र

## बी.ए. द्वितीय वर्ष (सेमिस्टर IV)

- डॉ. प्रज्ञा बागडे

## आरोग्य अर्थशास्त्र

## (Health Economics)

शारीरिक, मानसिक, सामाजिक दृष्टीने व्यवस्थित आणि रोगमुक्त असण्याची अवस्था म्हणजे आरोग्य. जागतिक आरोग्य संघटनेच्या दृष्टीने 'आरोग्य म्हणजे केवळ रोगांचा अभाव नसून ती एक शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक समतोलाची अवस्था होय' आरोग्य अर्थशास्त्र हे अर्थशास्त्राच्या अभ्यासाचे आदर्श असे क्षेत्र आहे. आरोग्य अर्थशास्त्राचा संबंध आरोग्याची निर्मिती आणि उपयुक्तता त्याचप्रमाणे कार्यक्षमता, प्रभावीपणा, जीवनाचे मूल्य आणि वर्तणूकीशी आहे. आरोग्य अर्थशास्त्राचा उद्देश हा वैयक्तिक, आरोग्य दक्षतांचा पुरवठाकर्ते, सरकार, खाजगी व सार्वजनिक संघटना यांची वर्तणूक समजून घेणे होय. आरोग्य अर्थशास्त्राचा उपयोग विशिष्ट सामाजिक समस्यांचे मूल्यांकन करण्यासाठी केला जाऊ शकतो तसेच सरकारला कायदे निर्मिती, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम इत्यादी संबंधी मार्गदर्शन करु शकते.

### आरोग्य अर्थशास्त्र : अर्थ (Meaning of Health Economics)-

आरोग्य अर्थशास्त्र हे आरोग्याची काळजी विषयक कार्यप्रणाली आणि आरोग्यावर विपरीत परिणाम करणाऱ्या विविध घटकांशी संबंधीत अध्ययन आहे. केनेथ ॲरो यांनी आरोग्य अर्थशास्त्राला एका शाखेच्या स्वरुपात मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते, आरोग्य अर्थशास्त्र हे इतर क्षेत्रापेक्षा वेगळे आहे व त्याचे कारण म्हणजे ह्यात सरकारचा हस्तक्षेप, अनियंत्रितपणा, अनिश्चितता व विश्वसनीय माहितीचा अभाव हे आहे. आरोग्य

अर्थशास्त्राच्या अध्ययनात आरोग्य विषयक काळजी घेणे, आरोग्याची वृद्धी, आरोग्याचे जतन करणे आणि आरोग्यात सुधारणा घडवून आणणे तसेच आरोग्य विषयक सेवांचाही समावेश होतो. थोडक्यात, आरोग्य विषयक सिद्धांताची मांडणी, संकल्पना आणि आरोग्य तंत्रज्ञान यांचे आर्थिक बाजू सांभाळणारे शास्त्र म्हणजे आरोग्य अर्थशास्त्र होय.

**आरोग्य अर्थशास्त्राची व्याख्या (Definition of Health Economics)-**

**World Health Organisation,** "आरोग्य ह्या शब्दाचा आशय केवळ लोकांच्या शारीरिक दुर्बलपणाशी नसून शरीरिक, मानसिक तसेच सामाजिक स्वरुपात मनुष्याचे पूर्णपणे सुदृढ असणे होय."

"आरोग्य अर्थशास्त्रात आरोग्य विषयक काळजी घेणाच्या साधनाच्या वाटपाचे अध्ययन होय. यात अर्थव्यवस्थेतील आरोग्य प्रणालीशी संबंधीत संसाधनांचे वाटप आणि आरोग्याची काळजी विषयक बाजारपेठेतील कार्यप्रणालीचा समावेश होतो."

"आरोग्य अर्थशास्त्राचा संबंध हे आरोग्य आणि आरोग्याची काळजी विषयक खर्चाचे सामान्य विश्लेषण, फायदे, त्याचे व्यवस्थापन इत्यादीद्वारे आरोग्यावर विजय मिळविण्याशी आहे."

**"आरोग्य अर्थशास्त्राचे घटक (Components of Health Economics)-**

१. आरोग्य अर्थशास्त्राचा अर्थ

२. आरोग्य अर्थशास्त्राची व्याप्ती

३. आरोग्य विषयक काळजीची मागणी

४. आरोग्य विषयक काळजीचा पुरवठा

५. आरोग्याची काळजी घेणाऱ्या बाजारपेठा

६. आर्थिक वृद्धी आणि आरोग्य सहसंबंध

७. आरोग्य क्षेत्राातील अंदाजपत्रक

८. राष्ट्रीय आरोग्य प्रणाली

९. प्राप्त आरोग्य

१०. आंतरराष्ट्रीय आरोग्य

**आरोग्य अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये (Features of Health Economics)-**

आरोग्य अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील -

१. आरोग्य आणि वैद्यकीय सेवा ह्या आर्थिक बाबी आहेत.

२. आरोग्य ही खाजगी तसेच सार्वजनिक मालमत्ता होय.

३. आरोग्याचे मोजमाप आर्थिक दृष्टीकोनातून केले जाते.

४. आरोग्य हा एक गुंतवणूकीचा प्रकार आहे.

५. खराब आरोग्यामुळे नुकसान होते.

६. आरोग्य आणि वैद्यकीय सेवेचे नियोजन केले जाते.

७. आरोग्य सेवा प्रणाली आणि तंत्रज्ञानामुळे आरोग्यात सुधारणा होते.

**आरोग्य अर्थशास्त्राचे क्षेत्र (Areas of Health Economics)-**

**१. आरोग्य समस्या (Health Problem)-**

आरोग्य समस्या देशाच्या आर्थिक प्रगतीला तसेच राष्ट्रीय सुरक्षिततेला अडथळा निर्माण करतात. आरोग्य हे आर्थिक विकासाचे निर्देशक आहे त्यामुळे आरोग्य अर्थशास्त्राच्या अभ्यासात त्यावर भर दिला जातो. भारतात आरोग्य विषयक धक्कादायक अनेक बाबी आहेत. भारतात बालमृत्यूचे प्रमाण संपूर्ण जगात सर्वात जास्त आहे. भारतातील आरोग्य समस्या ह्या आरोग्य अर्थशास्त्राच्या क्षेत्रातील महत्वपूर्ण बाब आहे.

## २. आरोग्य विषयक काळजीची मागणी (Demand for Health Care)-

वस्तूंकरीता असणाऱ्या मागणीपेक्षा आरोग्याकरीता असणारी मागणी निराळी असते. कारण व्यक्ती आपल्या जवळील संसाधनांचा वापर हा उपभोग घेणे व स्वास्थ प्राप्त करणे ह्या दोन्ही करीता करीत असतो. मागणीची संकल्पना ही आरोग्य अर्थशास्त्राचे सर्वस्व आहे. मागणी लवचिक किंवा अलवचिक असू शकते. मागणीच्या लवचिकतेचे स्वरुप वस्तूच्या किंमतीच्या बाबतीत व्यक्त केले जाते. म्हणून आरोग्य विषयक काळजीच्या मागणीचे विश्लेषण आरोग्य अर्थशास्त्राच्या व्याप्तीमध्ये येते.

## ३. आरोग्य विषयक काळजीचा पुरवठा (Supply of Health Care)-

कोणत्याही वस्तूच्या पुरवठ्यावर अनेक घटकांचा प्रभाव पडतो. उदा. किंमत, उत्पादन खर्च, मागणी इत्यादी. आरोग्य अर्थशास्त्रात आरोग्य विषयक काळजीच्या पुरवठ्याचा अभ्यास करतांना दवाखाने, औषधांचा पुरवठा, डॉक्टर्स, नर्सेसच्या सेवा, प्रयोगशाळा (पॅथॅलॉजी लॅब) विविध उपकरणे, तंत्रज्ञान इत्यादींच्या पुरवठ्याचा अभ्यास केला जातो.

## ४. आरोग्य दक्षता सेवा बाजार (Health Care Services Market)-

प्रकृती स्वास्थाची काळजी घेणाऱ्या बाजारपेठांमध्ये स्वास्थवर्धक वित्त पुरवठा करणारी बाजारपेठ, आरोग्याधिकारी आणि परिचारिका सेवा बाजारपेठ संस्थापक सेवा बाजारपेठा, आदान-घटक बाजारपेठा सारख्या बाजारांचा समावेश आहे. या संस्थांची उद्दिष्ट्ये फार चांगली असली तरी त्या संस्था सन्मार्गापासून बऱ्याच वेळा दूर गेलेल्या असतात. स्वास्थ अर्थशास्त्राच्या व्याप्तीमध्ये आरोग्य सेवा बाजार कशा प्रकारे कार्य करतो याचे अध्ययन केले जाते.

### ५. आरोग्य समस्या (Health Problem)-

स्वास्थ समस्या ह्या देशाच्या आर्थिक विकासाला तसेच राष्ट्रीय सुरक्षिततेला कशा प्रकारे बाधा निर्माण करतात? ह्याचा अभ्यास आरोग्य अर्थशास्त्रात केला जातो. आरोग्य समस्यांशी संबंधित विविध कारणांचा, आरोग्य उद्योग व आर्थिक विकास यांच्यातील सहसंबंध स्पष्ट केला जातो.

### ६. आरोग्य क्षेत्रातील अंदाजपत्रक (Health Plan and Outlays)-

देशाचे नागरीक म्हणजे देशाचे मनुष्यबळ शारीरिकदृष्ट्या व मानसिकदृष्ट्या निरोगी बनविण्याकरिता स्वास्थ सेवांना प्राधान्य देणे प्रत्येक देशाचे उद्दिष्ट असते. त्यादृष्टीने प्रत्येक देश शक्य तितक्या स्वास्थ सुविधा व स्वास्थ दक्षता कार्यक्रमाच्या योजना तयार करते. स्वास्थ योजनांचा प्रमुख उद्देश म्हणजे आरोग्य सुविधा निर्माण करुन देशातील जनतेला किफायतशीर आरोग्य सुविधा पुरविणे.

### ७. आरोग्य दक्षता खर्च (Cost of Health Care)-

आरोग्य दक्षतामध्ये आरोग्यात सुधारणा करण्यासाठी लागणाऱ्या सर्व सेवा सुविधांचा समावेश होतो. आरोग्य अर्थशास्त्र हे आरोग्य दक्षता उद्योगात वापरल्या जाणाऱ्या विविध खर्च संकल्पना स्पष्ट करते. आरोग्य दक्षता उद्योग गैरलाभकारी क्षेत्र असल्यामुळे आरोग्य शिक्षण व आरोग्यदायी पर्यावरणाच्या विकासाकरीता खर्चाची बाजू दुय्यम ठरते.

### ८. आरोग्य दक्षता आद्योगासाठी वित्त पुरवठा (Financing for Health Care Industry)-

आरोग्य अर्थशास्त्रात आरोग्य उद्योगासाठी उपलब्ध असलेल्या वित्ताच्या विविध स्त्रोतांचा अभ्यास केला जातो. यामध्ये अल्पकालीन व दीर्घकालीन निधी उपलब्ध करुन

देणाऱ्या नाणेबाजाराचा व भांडवल बाजाराचा अभ्यास केला जातो. एवढेच नव्हे तर आरोग्य दक्षता उद्योगाला कर्ज व अग्रिमाचा पुरवठा करणाऱ्या खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील बँकाचा सुद्धा अभ्यास केला जातो. या व्यतिरिक्त सरकार विविध माध्यमातून निधी उपलब्ध करुन आरोग्य दक्षता उद्योगाला केलेल्या पुरवठ्याचाही अभ्यास केला जातो.

**९. संसाधनांचा सर्वोत्तम वापर (Optimum Utilisation of Resources)-**

आरोग्य अर्थशास्त्राचे एक महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे संसाधनांचा योग्य वापर करणे. संसाधनाचे योग्य वाटप केल्यास कमीत-कमी खर्चात अधिकतम लाभ प्राप्त होतो. संसाधनामध्ये मानवी आरोग्यात सुधारणा करणाऱ्या मनुष्यबळाचा व सामग्रीचा समावेश होतो.

## भारतातील आरोग्यविषयक समस्यांची कारणे (Causes of Health Problems in India)-

आरोग्य अर्थशास्त्र आरोग्याची दक्षताविषयक कार्यप्रणाली आणि आरोग्यावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांशी संबंधीत अध्ययन आहे. भारताला स्वातंत्र्या मिळून ७० वर्षे होऊन भारतातील गरीब जनता अजूनही निरोगी आयुष्य जगण्यासाठी, आरोग्य सोयी सुविधांसाठी झटत आहेत. स्वास्थासंबंधी समस्या ही संपूर्ण देशासाठी समान्य बाब झाली आहे. ह्या स्वास्थसंबंधी समस्यांची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१. शिक्षणाचा अभाव (Lack of Education)-**

भारतातील साक्षरतेचे प्रमाण ७४ टक्के असून २६ टक्के लोक अशिक्षित आहेत. त्यात स्त्रियांची साक्षरता पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. स्त्रियांची साक्षरता कमी असल्यामुळे त्यांना सरकारच्या स्वास्थ विकासाबाबतची धोरणे, कार्यक्रम यांची माहिती नसते. त्यांना

मुलांची, कुटुंबियांची व स्वतःची काळजी कशी घ्यावी माहित नसते. बरेचदा औषधोपचारावीणा त्यांच्यावर मृत्यू ओढवतो.

**२. कुपोषण (Malnutrition)-**

भारतातील लोकांचे आरोग्य स्वस्थ नसण्यामागे कुपोषण हे सर्वात मोठे कारण आहे. जन्मापूर्वी माता सुदृढ नसेल तर बाळही सुदृढ राहणार नाही. जन्मानंतरही जर आर्थिक परिस्थिती खराब असेल तर पुरेसा औषधोपचारही होत नाही. कुपोषण हे आरोग्य विषयक समस्यांचं महत्वाचं कारण आहे.

**३. शुद्ध पीण्याच्या पाण्याचा प्रश्न (Problem of Pure Drinking Water)-**

वाढत्या लोकसंख्येमुळे स्वच्छ व पुरेसे पाणी पुरविण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभर होतो आहे. केरकचऱ्याचा निपटारा हाही एक मोठा प्रश्न आहेच. यावरुन निर्माण होणाऱ्या स्वास्थ संबंधी समस्या उभ्या ठोकलेल्या आहेच. ह्या समस्या सोडविण्यासाठी मनुष्यबळ, आरोग्य विषयक सेवा तसेच औषधीविषयक पुरेशा सोयींची कमतरता आहेत.

**४. उच्च जन्मदर व लोकसंख्या वाढ (High Birth Rate and Growth of Population)-**

भारतात उच्च जन्मदर हा अनेक समस्यांचे कारण आहे. भारतात बहुसंख्यलोक अत्यंत दयनीय अवस्थेत राहतात. त्यांच्या आजुबाजूचा परिसर अत्यंत घाणेरडा व अनारोग्यपूर्ण असतो. त्यामुळे संसर्गजन्य रोगांची लागण झपाट्याने होते. वाढत्या लोकसंख्येमुळे स्वास्थाची पुरेशी काळजी घेण्याइतपत त्यांची ऐपत नसते. त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

### ५. दारिद्र्य (Poverty)-

२००१ च्या जनगणनेनुसार २५ टक्के लोकसंख्या अजुनही दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होती. किमान आवश्यक कॅलरीज ते दारिद्र्यामुळे प्राप्त करु शकत नाहीत. अनेक आजारांनी गस्त असूनही वैद्यकीय उपचारासाठी पैसा  नाही. भारतातील दारिद्र्याचा प्रश्न एक भयानक ज्वलंत समस्या आहे.

### ६. मानसिक आरोग्य (Mentaly Health)-

बदलत चाललेल्या कुटूंबव्यवस्थेमुळे, विविध आर्थिक समस्यांमुळे नैराश्यात जाण्याचे प्रमाण वाढत चालले आहे, लोकसंख्या वाढत आहे परंतु माणसे एकमेकांपासून तुटत चालली आहे, भांवनांचा कोंडमारा होतांना दिसतो आहे. अशा स्थितीत मानसिक आरोग्य धोक्यात येऊ पाहात आहे. आज मानसिक आरोग्य भारतातील आरोग्याच्या प्रश्नाचे कारण बनत चालले आहे.

### ७. पर्यावरणाचा ऱ्हास (Loss of Environment)-

भारतातील प्रदुषणकारी वायुंचे उत्सर्जन वाढत आहे. यामध्ये जागतिकदृष्ट्या भारताचा पाचवा क्रमांक आहे. मुंबई शहर जगातील पंधराव्या क्रमांकाचे प्रदुषित शहर असून दरवर्षी आठ हजार मुंबईकर वायु प्रदुषणामुळे मृत्यूमुखी पडतात असे जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. पर्यावरणाचा समतोल ढासळायला औद्योगिक क्रांतीपासून सुरवात झाली. आज पर्यावरणाचा ऱ्हास होतांना दिसत आहे. पर्यावरणात सुधारणा करणं आवश्यक असून सुधारणा करणं शक्य आहे काय? हा पर्यावरण शास्त्रज्ञांसमोरचा मोठा प्रश्न आहे.

### ८. अल्प सरकारी मदत (Low Govt. Subsidy)-

नियोजन काळापासून सरकारने आरोग्यासंबंधी सेवांच्या खर्चाकरीता जी तरतूद केली ती लोकसंख्येच्या तुलनेत अल्प आहे. कोणत्याही देशाच्या आर्थिक, सामाजिक विकासाकरीता उत्तम स्वास्थाची आवश्यकता असते. आरोग्यामधील गुंतवणूक भावी आयुष्यासाठी लाभदायक ठरते. उत्तम आरोग्य हे आर्थिक विकासाचे महत्वाचे निर्देशक आहे. परंतु भारतात त्याकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही.

### ९. सामाजिक आणि धार्मिक कारणे (Social and Religions Causes)-

आरोग्य हा केवळ वैद्यकशास्त्राचा प्रश्न नाही. त्याला सामाजिक धार्मिक संदर्भ अपरिहार्यपणे येतात. अजूनही भारतातील ६६ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील आरोग्याची स्थिती आणखीनच गंभीर आहे. सामाजिक आणि धार्मिक चालीरीतींचा पगडा वैद्यीकशास्त्रालाही मात देतो. भारतातील सामाजिक, धार्मिक चालीरीती हे सुद्धा आरोग्य विषयक समस्यांचे एक कारण आहे.

### १०. इतर कारणे (Other Causes)-

वरील कारणांव्यतिरिक्त खालील कारणेही आरोग्य विषयक समस्यांची कारणे आहेत.

अ. पायाभूत वैद्यकीय सोयीची कमी

ब. अशिक्षीतपणा

क. अंधश्रद्धा

ड. स्वच्छता व पीण्याचे पाणी

इ. स्वास्थ शिक्षणाची कमी

फ. दवाखान्यांची कमी

ग. डॉक्टर नर्सेसची कमी

**आरोग्य वित्ताचे स्त्रोत (Sources of Health Finance) -**

आरोग्य वित्त म्हणजे आरोग्यासंबंधी समस्या सोडविण्यासाठी करण्यात आलेली वित्तीय व्यवस्था होय. भारतात आरोग्य दक्षता सेवांचा पुरवठा सार्वजनिक व खाजगी अशा दोन्ही क्षेत्राकडून केला जातो. सार्वजनिक क्षेत्राला सरकारकडून वित्त पुरवठा केला जातो. भारतात आरोग्य संवर्धनासाठी होणाऱ्या सरकारी खर्चात वाढ करण्याची नितांत गरज असतांनासुद्धा सतत घट होतांना दिसत आहे. विकसित देशांमध्ये आरोग्य संवर्धनासाठी होणारा एकूण खर्च हा G.D.P. च्या ५ टक्के एवढा आहे. तर भारतात आरोग्य सेवांवरील खर्च हा G.D.P. च्या १ टक्के एवढा आहे. २००५ मध्ये आरोग्य संवर्धनाकरीता काही योजना सुरु केल्या त्यातील NRHM - National Rural Health Mission ही एक असून ह्या काळात आरोग्यावर होणाऱ्या खर्चात थोडीफार वाढ करण्यात आली.

**आरोग्य वित्ताचे स्त्रोत -**

भारतात आरोग्य वित्ताचे विविध स्त्रोत खालीलप्रमाणे आहेत -

**अ) शासकीय स्त्रोत -**

१. आरोग्य मंत्रालय

२. इतर शासकीय विभाग आणि अंतर्गत विभाग

३. सक्तीची शासकीय आरोग्य विमा योजना

४. विभागिय शासकीय अधिमान्य संस्था आणि स्थानिय संस्थान

**ब) खाजगी स्त्रोत -**

१. खाजगी वैयक्तिक क्षेत्र

२. खाजगी सेवा योजना आरोग्य विधी

३. खाजगी आरोग्य विमा योजना

**क) बहीर्गत स्त्रोत -**

१. कार्यालयीन

२. गैर-कार्यालयीन

३. बहुपक्षीय

४. द्विपक्षीय

**ड) मिश्र स्त्रोत -**

१. सामुदायिक वित्त व्यवस्था

२. मिशनरी आणि धार्मिक संस्था

३. आरोग्य विमा

**आरोग्य वित्ताचे उद्देश (Objects of Health Finance) -**

आरोग्य वित्ताचे उद्देश खालील प्रमाणे सांगता येतील -

१. आरोग्य सेवा विषयक गरज निर्माण झाल्यास खर्चाकरीता निधीची उपलब्धता करणे.

२. अचानक आरोग्यसंबंधी समस्या उद्‌भवल्यास एक आव्हान म्हणून त्याचा सामना करणे.

३. आरोग्य सेवा पुरविणाऱ्यांना योग्य तो मोबदला देणे.

४. आरोग्य संवर्धन करण्यासाठी उपयोग करणे.

५. सर्वांना आरोग्य सेवा परवडण्यासारखी उपलब्ध व्हावी.

**भारतातील आरोग्यावरील खर्च -**

राष्ट्रीय स्वास्थ लेखांकनानुसार २००१-०२ मध्ये भारतातील स्वास्थ संवर्धनावरील खर्च १,६५,७३० कोटी रुपये होता. तो GDP च्या ४.६ टक्के होता. २०११ मधील स्वास्थावरील खर्च GDP च्या ३.९ टक्के होता. भारतातील स्वास्थावरील खर्च फार कमी आहे. स्वास्थावरील खर्चात विशेषत: सरकारी खर्चात वाढ करणे आवश्यक झाले आहे. जेणे करुन त्यामुळे चांगल्या स्वास्थ सुविधा उपलब्ध करुन देणे व गरीब लोकांना किमान खर्चात उपचार घेणे शक्य होईल.

१२ व्या योजनेअंतर्गत केंद्रिय सरकार व राज्य सरकार ह्यांचा आरोग्य विभागावरील खर्च वाढविणे, स्वच्छ पाणी पीण्याच्या सोयी, स्वच्छता मोहीम याद्वारे भरीव कार्य करण्याचे ठरविण्यात आले. १२ व्या योजनेअंतर्गत राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना (RSBY) द्वारे दारिद्र्यरेषेखालील लोकांकडे पूर्ण लक्ष देण्यात येईल, प्रचलीत असलेल्या योजनांचा व उपलब्ध असलेल्या संसाधनांचा आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने महत्तम उपयोग करुन आरोग्यसंवर्धनाबाबतचे चांगले परिणाम यावेत ह्यादृष्टीने प्रयत्न करणे, वैद्यकीय शाळा, नर्सिंग महाविद्यालये ह्यांद्वारे आरोग्य सेवकांची संस्था वाढविणे, सार्वजनिक आरोग्य, आरोग्य संरक्षणाकरीता आवश्यक परिस्थितीचे सुव्यवस्थित नियंत्रण करुन रोगांच्या होणाऱ्या पिळवणुकीवर नियंत्रण ठेवणे व त्यांना त्यापासून मुक्त करणे, देशातील आरोग्यविषयक त्रुटी व कमतरता शोधून त्यावर योग्य ती उपाययोजना करणे इ. तरतुदी करण्यात आल्या आहेत.

## अपेक्षित प्रश्न

### दिर्घोत्तरी प्रश्न

१. आरोग्य अर्थशास्त्र म्हणजे काय? आरोग्य अर्थशास्त्राचे क्षेत्र कोणते?

२. भारतातील आरोग्यविषयक प्रश्नांची किंवा समस्यांची माहिती लिहा.

३. आरोग्यविषयक वित्तस्त्रोतांची माहिती द्या.

४. आरोग्य संवर्धन योजनांवर करण्यात येणाऱ्या खर्चाचे समिक्षण करा.

### लघुत्तरी प्रश्न

१. आरोग्य अर्थशास्त्र म्हणजे काय?

२. आरोग्य अर्थशास्त्राची व्याप्ती सांगा.

३. आरोग्य अर्थशास्त्राचे क्षेत्र कोणते?

४. भारतातील आरोग्य समस्यांची कारणे सांगा.

५. भारतातील आरोग्यावरील खर्चाची माहिती द्या.